**मतदारांच्या कृपेने अभूतपूर्व यश मिळूनसुद्धा आपापसातील कुरघोड्यांमुळे आणि रोज उद्भवणाऱ्या नवीन वादांमुळे टीकेचे लक्ष होणाऱ्या युती सरकारच्या प्रतिमेमध्ये घसरण होत आहे. त्यातच दोन प्रमुख नेत्यांमधील शीतयुद्धाने विरोधकांच्या हाती आयते कोलीत मिळाले आहे. शिंदे आणि फडणवीस यांच्यातील शीतयुद्ध सतत चर्चेत राहणे हा सध्याच्या राजकारणातला चर्चेचा विषय बनला आहे.**



# शासकीय शीतयुद्ध!

वेध

**प्रा. अशोक ढगे**

२०१९ मधील विधानसभा निवडणुकीनंतर भाजप–शिवसेना युती संपुष्टात येऊन महाआघाडीची निर्मिती झाली. या अपमानाचा सूड म्हणून भाजपाने शिवसेनेपासून एकनाथ शिंदेंचा एक गट वेगळा केला. त्यावेळी भाजपाने विधानसभेच्या उरलेल्या अडीच वर्षांच्या कालावधीसाठी एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री केले. एकनाथ शिंदेंनी मुख्यमंत्रिपदाचा उरलेला अडीच वर्षांचा काळ लक्षात घेऊन महायुतीच्या जाहीरनाम्यातील दहा महत्त्वाच्या घोषणा अंमलात आणल्या. यात लाडकी बहीण योजना, शेतकरी कर्जमाफी, रोजगारनिर्मिती आणि वृद्धांना पेन्शनवाढ यासारख्या प्रमुख घोषणा करण्यात आल्या होत्या. पक्षफुटीला कारणीभूत धरून वारंवार गद्दार, गद्दार म्हणून होणारी टीका आणि अधूनमधून स्वकीय मंत्र्यांकडून केली जाणारी बेताल वक्तव्ये यावर मलमपट्टी म्हणूनही या योजनांचा फायदा घेण्याचा त्यांचा उद्देश होता. जुलै २०२३ मध्ये शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधून वेगळे होत अजित पवार यांनी आपला स्वतंत्र गट स्थापन केला आणि तेदेखील युती सरकारमध्ये सामील झाले.

त्यानंतर २० नोव्हेंबर २०२४ रोजी झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये युतीमधील तिन्ही पक्षांना अभूतपूर्व यश मिळाले आणि त्यांनी सरकार स्थापन केले. मुख्यमंत्रिपद आपल्याला मिळावे, अशी मागणी एकनाथ शिंदे यांनी केली. पण एकदा मुख्यमंत्रीपदावर पाणी सोडणारा भाजप यावेळी हे पद सोडायला तयार नव्हता. त्यातच अजित पवार यांनी चतुराईने देवेंद्र फडणवीसांना बिनशर्त पाठिंबा देऊन एकनाथ शिंदेंच्या मुख्यमंत्रीपदावरच्या दाव्याला एक प्रकारे सुरुंगच लावला. तेथूनच शिंदे आणि फडणवीस यांच्यात शीतयुद्धाला सुरुवात झाली. गेले तीन महिने अधूनमधून त्याचे पडसाद उमटत आहेत आणि सध्याच्या राजकारणात तो चर्चेचा विषय बनला आहे.

युतीतल्या आमदारांना जाहीर झालेल्या मंत्रिपदावरून या शीतयुद्धाची दुसरी ठिणगी पडली. देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेनेच्या मानाने आपल्या दुसऱ्या सहकारी पक्षाला अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला महत्वाची मंत्रिपदे दिली. शिंदेंबरोबर सेनेतून बाहेर पडलेल्या त्यांच्या मर्जीतल्या काही आमदारांना मंत्रिपदे मिळाली नाहीत. त्यात प्रामुख्याने दीपक केसरकर आणि तानाजी सावंत यांचा समावेश होता. त्यावेळी फेरबदल होईल तेव्हा त्यांना मंत्रिपदे मिळतील, असे तात्पुरते आश्वासन त्यांना देण्यात आले, पण त्याला विशिष्ट कालमर्यादा दिली नव्हती. मुख्यमंत्री झाल्यावर फडणवीसांनी २०१९ च्या आघाडी सरकारच्या आणि त्यानंतर अडीच वर्षे चाललेल्या शिंदे सरकारमधील काही निर्णयांची चौकशी करण्याचा निर्णय घेतला. त्यात बहुत करुन शिवसेनेच्या मंत्र्यांच्या खात्यांचा समावेश आहे. त्या वेळच्या मुक्त कारभाराला एक प्रकारे वेसण घालण्यास सुरुवात केली. यात खुद्द एकनाथ शिंदे मंत्री असताना मंजूर झालेल्या जालन्यातील ९०० कोटी बजेटच्या खारपोडी प्रकल्पाची चौकशी करण्याचा निर्णय घेतला गेला. हा प्रकल्प फायद्याचा नाही असा अहवाल असतानादेखील तो सुरू करण्यात आला. त्यावेळी त्याला मंजुरी कोणी दिली, कोणते निकष लावले गेले याची चौकशी आता सुरू आहे. एकनाथ शिंदेंच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीत गोरगरिबांसाठी सुरू करण्यात आलेली १५०–२०० कोटी बजेट असणारी आनंद शिधा योजना आणि २५०–३०० कोटी बजेट असलेली शिवभोजन थाळी योजना फेरविचारासाठी पुढे आल्या. इतरही काही निर्णय चौकशीच्या फेऱ्यात आले तर काही सरळ रद्दबातल करण्यात आले आहेत.

दावोसमधील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या कार्यक्रमाला जाताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकमंत्र्यांच्या यादीमध्ये रायगडमधून शिंदेच्या भरत गोगावले यांच्याऐवजी आदिती तटकरे आणि नाशिकमध्ये होऊ घातलेल्या पंधरा हजार कोटींचे बजेट असलेल्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर दादा भुसे यांच्याऐवजी गिरीश महाजन यांना पुरस्कृत केले. त्यावरूनही शिंदे आणि फडणवीस यांच्यातील शीतयुद्धाची झलक पहायला मिळाली. यावरून मंत्रिपदे लोककल्याणासाठी आहेत की मिरवायला, अशी टीका करायची संधी विरोधकांना आपोआप मिळाली. याच सुमारास शिंदे सेनेचे भारत गोगावले एसटी महामंडळाचे अध्यक्ष असताना १३१० बसेस भाडेतत्वावर घेण्याच्या व्यवहारात सरकारला २२०० कोटींचा फटका बसणार होता. फडणवीसांनी तो व्यवहार रद्द केला. दरम्यान, शिंदेंचे निकटवर्तीय राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या खात्यातील सरकारी अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यपद्धतीवर नाराज होऊन परस्पर निर्णय घ्यायला सुरुवात केली. त्यावेळी सामंत यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून नाराजी व्यक्त केली. प्रत्यक्ष एकनाथ शिंदेंनी घेतलेल्या काही निर्णयांचीदेखील सखोल चौकशी सुरू केली आहे. याच सुमारास मंत्र्यांचे सचिव तसेच ओएसडी यांच्या नेमणुका करताना मुख्यमंत्र्यांची परवानगी आवश्यक असल्याचा नियम फडणवीसांनी घातला.

अशा प्रकारे युती सरकारमध्ये शह काटशहाचा खेळ सतत पहायला मिळत आहे. शासकीय कामकाजातून जाणवणारे मतभेद स्थानिक राजकारणाच्या पातळीवरही दिसू लागले आहेत. वैद्यकीय क्षेत्रसुद्धा या राजकारणातून सुटलेले नाही. कोरोनासारख्या महामारीचा सामना करण्यासाठी उभारलेल्या यंत्रणेचे प्रमुख म्हणून शिंदेंच्या कार्यकाळात कामकाज पाहणाऱ्या मंगेश चिवटेंना हटवून फडणवीसांनी रामेश्वर नाईक यांची नियुक्ती केली. महायुती सरकारच्या अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर आलेला आर्थिक पाहणी सर्वेक्षण अहवाल समाधानकारक नसताना सरकारमधल्या दोन ज्येष्ठ नेत्यांमध्ये चाललेले शीतयुद्ध निश्चितच अस्विकार्ह आहे. राज्यापुढे आर्थिक संकट उभे असताना मीडियाद्वारे होणारी सरकारची होणारी बदनामी थांबणे अपेक्षित आहे.

महसुली जमा आणि खर्चामध्ये मोठी तफावत आढळून आली आहे, ती दुर्लक्षित करून चालणार नाही. उद्योग आणि सेवाक्षेत्राच्या वाढीत आलेली घट आणि महसुली खर्चात जमेपेक्षा वीस हजार कोटींची वाढ हा सरकारच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे.

राज्याच्या दरडोई उत्पन्नात काही प्रमाणात समाधानकारक प्रगती आहे. ही एक जमेची बाजू असली तरी उद्योग आणि सेवा क्षेत्राची वाढ मंदावली आहे. ऊस आणि तेलबियांच्या उत्पादनात घट होणार असली तरी तृणधान्ये, कडधान्ये आणि कापूस यांच्या उत्पादनात लक्षणीय वाढ अपेक्षित आहे. महसुली जमेपेक्षा वाढलेला खर्च, कर्ज आणि त्यावरील व्याजात होणारी वाढ हे विकासातले अडथळे असताना कृषी क्षेत्र अर्थव्यवस्थेला तारून नेईल अशी अपेक्षा आहे. अशा वेळी कृषी क्षेत्राला सरकारी योजनांचा लाभ आणि थेट मदत मिळणे अपेक्षित आहे. एकीकडे दोन दिग्गज नेत्यांच्या बिघडलेल्या संबंधात भर म्हणून की काय, चोहो बाजूंनी घेरले गेलेले केंद्रीय मंत्री धनंजय मुंडे यांचे राजीनामानाट्य चांगलेच गाजत आहे. सरकारला अडचणीत आणू शकणारे असे मुद्दे समोर असताना सरकारमध्ये चाललेले शह–काटशहाचे राजकारण जनता उघड्या डोळ्याने पाहत आहे, हे सरकारच्या लोकप्रियतेला ठेच पोहोचवणारे आहे.

आघाडी सरकार पाडल्याबद्दल फुटीर आमदारांवर आगपाखड करताना विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना विचलित करत, त्यांच्या हातून लोककल्याणाची कामे होणार नाहीत हा आरोप सातत्याने केला आहे. वास्तविक, विरोधकांच्या आरोपांना महत्त्व न देता शिंदे गटाच्या आमदार आणि मंत्र्यांनी लोककल्याणाची कामे करत राहणे अपेक्षित होते. मात्र तसे न होता शिंदे गटाच्या नेत्यांनीदेखील टीका केली. संजय शिरसाट आणि संजय राऊत, रामदास कदम आणि भास्कर जाधव, निलेश राणे आणि संजय राऊत, उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे, फडणवीस आणि उद्धव ठाकरे अशा जबाबदार नेत्यांनी एकमेकांवर कधी राजकीय तर कधी वैयक्तिक पातळीवर टीका केली. काहीजणांनी तर या वाकयुद्धात सुसंस्कृतपणाला काळीमा फासण्याच्या हद्दी पार केल्या. याने राज्याच्या राजकारणाची, खास करून सरकार पक्षाची प्रतिमा डागाळली. एकमेकांना शह–काटशह देण्याचा हा खेळ कुठवर चालेल हे सांगता येणार नाही, पण एखादी गोष्ट कुठवर तणावी याला काही मर्यादा असते.

४५ विरोधक आमदार म्हणजे फार मोठी ताकद नव्हे, म्हणून त्यांच्यापासून सरकारला धोका नाही. दरम्यान, भाजपाला सध्या तरी स्थैर्याची चिंता नाही. अडीच–तीन महिन्यांनी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या वेळी स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणे कशी बदलतील, याचा आत्ताच अंदाज लागणे कठीण आहे, पण एक नक्की की, युतीला विकासाची आणि विधायक कामे करायला सत्ता देणाऱ्या जनतेची करडी नजर सरकारवर नक्कीच असेल. केलेल्या विकासकामांचा आणि एकमेकांवर केलेल्या कुरघोडींचा मतदार त्यावेळी नक्की हिशेब मागतील. आपल्याला त्यासाठी तयार रहावे लागेल, याची जाणीव या सरकारने आजच बाळगणे अधिक श्रेयस्कर.

---

**वाहनांच्या विक्रीत घट, सोन्याच्या कर्जात वाढ, शेअर बाजाराची कमकुवत कामगिरी आणि आता अमेरिकच्या टॅरिफचा फटका या घडामोडी भारतीय अर्थव्यवस्था संकटातून जात असल्याचे सूचित करतात. सरकार भलेही जीडीपी वाढीचे आकडे सादर करेल; पण सर्वसामान्यांच्या जीवनात सुधारणा दिसत नाही. लोकांचे उत्पन्न सुधारण्यासाठी ठोस पावले उचलली न गेल्यास मंदीचे हे वादळ भयंकर स्वरूप धारण करू शकते.**

# मंदीचे वारे दृष्टीपथात...

परामर्श

**हेमंत देसाई**

ज्येष्ठ पत्रकार

भारताच्या उत्पादन क्षेत्राला फारशी गती मिळताना दिसत नसून फेब्रुवारी २०२५ मध्ये कमी झालेल्या वर्क ऑर्डर्समुळे उत्पादनही घसरले. परिणामी, गेल्या १४ महिन्यांच्या नीचांकाची पातळी गाठली गेली. उत्पादन क्षेत्रातील खरेदी व्यवस्थापकांचा कल जोखणाऱ्या सर्वेक्षणावर आधारित 'एचएसबीसी इंडिया मॅन्युफॅक्चरिंग पर्चेसिंग मॅनेजर्स इंडेक्स' फेब्रुवारीमध्ये ५६.३ गुणांवर नोंदवला गेला. जानेवारीमध्ये तो ५७.७ इतका होता. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलेला कॅनडा, चीन आणि मेक्सिकोवर आयात शुल्क लागू करण्याचा इशारा प्रत्यक्ष अमलात आला आहे. अमेरिका आणि मेक्सिको, कॅनडा आणि चीन या देशांमध्ये भडकलेल्या व्यापारयुद्धाचा परिणाम अमेरिकेच्या भांडवल बाजारावरही झाला आहे. बांधकाम व्यवसाय, विद्युत आणि ऊर्जा क्षेत्रातील कंपन्यांचा अपवाद वगळता, अमेरिकेतील बहुतांश क्षेत्रांमधील कंपन्यांचा शेअर निर्देशांक कोसळला आहे. भारतीय भांडवली बाजारालाही आज ना उद्या याचा आणखी फटका बसणार आहे, हे निश्चित. जागतीक शेअर बाजारातील घसरण आणि परकीय गुंतवणूकदारांकडून निधी बाहेर जाण्याचा क्रम सुरू राहिल्याने, सेन्सेक्स ७३ हजारांखाली गेला. निफ्टीने तर अलिकडे तीन दशकांच्या इतिहासातली सर्वात मोठी दहा दिवसांची घसरण मालिका नोंदवली. अलीकडील काळात आंतरराष्ट्रीय मागणीमुळे भारतीय कंपन्यांकडे उत्तम मागणी होती. त्यामुळे त्यांना अतिरिक्त कामगारभरतीही करावी लागली. परंतु अमेरिकेमध्ये डोनाल्ड ट्रम्प अध्यक्षपदी आल्यानंतर ही सर्व परिस्थिती बदलली आहे. त्यामुळे केंद्र सरकारला सावधपणे पावले टाकावी लागतील.

सुदैवाने अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या पायाभूत क्षेत्रांच्या उत्पादनामध्ये जानेवारीमध्ये ४.६ टक्क्यांची वाढ झाली. जानेवारी २०२४ मध्ये ही वाढ ४.२ टक्के इतकी होती. खनिज तेल आणि नैसर्गिक वायूचे उत्पादन गेल्या वर्षीच्या तुलनेत वाढले असले, तरी कोळसा, पोलाद आणि वीजनिर्मितीमध्ये भर पडली आहे. देशाला २०४७ पर्यंत उच्च उत्पन्न राष्ट्रांच्या गटात स्थान मिळवण्यासाठी सरासरी ७.८ टक्के विकासाची गती राखावी लागेल, असे जागतिक बँकेच्या ताज्या अहवालात म्हटले आहे. उच्च उत्पन्न गटात सामील होण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी देशाला वित्तीय तसेच जमीन व कामगार बाजारपेठेत सुधारणांची आवश्यकता असणार आहे. परंतु त्या दिशेने काही वाटचाल होत असल्याचे दिसत नाही. २००० ते २०२४ दरम्यान भारताच्या अर्थव्यवस्थेने सरासरी ६.३ टक्के वाढीचा वेग कायम राखला असून ही गती आणखी वाढवावी लागणार आहे. उत्पादन आणि खाण क्षेत्रांच्या सुमार कामगिरीमुळे २०२४–२५ च्या ऑक्टोबर ते डिसेंबर या तिसऱ्या तिमाहीमध्ये देशाचे सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) ६.२ टक्के नोंदवले गेले, अशी माहिती राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने दिली आहे. सरकारने संपूर्ण आर्थिक वर्षासाठी वाढीचा अंदाज सुधारून ६.५ टक्क्यांपर्यंत वाढवला असला, तरी तोही चार वर्षांमधील नीचांक नोंदवणारा असेल. दुसऱ्या तिमाहीमध्ये तर जीडीपी वाढ फक्त ५.४ टक्के इतकी, म्हणजे सात तिमाहींतील नीचांकी पातळीवर आली होती.

जानेवारी २०२५ च्या अखेरीपर्यंत केंद्र सरकारची वित्तीय तूट ही वार्षिक उद्दिष्टांच्या ७५ टक्क्यांवर पोहोचली आहे. या तुटीचा आकडा आहे ११ लाख ६९ हजार कोटी रुपये. २०२३–२४ च्या याच कालावधीमध्ये ही तूट ६४ टक्के इतकी होती. गेल्या वर्षी लोकसभा निवडणुका तसेच विविध राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका असल्यामुळे केंद्र सरकारने केलेल्या भरपूर खर्चाचाच हा परिणाम म्हणावा लागेल. त्यापैकी मोठ्या प्रमाणावरील खर्च हा अनुत्पादक होता, हे लक्षात घेतले पाहिजे. जागतिक प्रतिकूलतेमुळे जगात मंदीसदृश परिस्थिती असताना देशाला व्यापार आणि गुंतवणुकीसाठी सुदृढ द्विपक्षीय संबंध प्रस्थापित करावे लागतील, असे प्रतिपादन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केले आहे. याचा अ थ' जगातील मंदीचा फटका भार- तालाही बसू लागला असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. अमेरिकी चलनाची वाढती ताकद बघता, डॉलरच्या तुलनेत रुपया ८७ वरून आता ८८ च्या दिशेने झेपावत आहे. आगामी काळात भारताच्या निर्यातीला मोठा फटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. अमेरिका ही भारताची एक सर्वात महत्त्वाची बाजारपेठ असून यापुढे तुम्ही जेवढे कर लादाल, तेवढेच आम्हीही लादू, अशी स्पष्टोक्ती ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोर व्यक्त केली आहे.

येथे एक लक्षात घेतले पहिजे की, आतापर्यंत डब्ल्यूटीओ किंवा जागतिक व्यापार संघटनेच्या माध्यमातून व्यापार पार पडत होता. मात्र यापुढे 'मोस्ट फेवर्ड नेशन' ही संकल्पना नसेलच. डब्ल्यूटीओ तसेच अन्य आंतरराष्ट्रीय संस्थांचे महत्त्व कमी होणार असून भारताला वेगवेगळ्या देशांशी करार करावे लागतील. सुदैवानै भारताने ब्रिटन आणि अमेरिकेसोबत द्विपक्षीय करार करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. तसेच युरोपीय युनियनशी मुक्त व्यापार करार करण्याची आपली धडपड आहे. अर्थात हे करार भारताच्या दृष्टीने अधिक लाभदायक ठरले पाहिजेत. अन्यथा, तेच आपल्या बाजारपेठेचा फायदा उठवत राहतील. देशात पाऊसपाणी उतम असले, तरीदेखील ट्रम्प पर्वानंतर जगापुढे आर्थिक संकट उभे ठाकले आहे. त्याचा प्रतिकार करण्यासाठी भारताला कल्पक उपाययोजना करावी लागेल. आंतरराष्ट्रीय स्तरावरही भारतासाठी अडचणी वाढत आहेत. अलीकडेच ट्रम्प यांनी काँग्रेसच्या संयुक्त अधिवेशनात भारताचा उल्लेख करताना व्यापार धोरणातील बदलांची घोषणा केली. ट्रम्प म्हणाले की, अमेरिका आता विदेशी आयातीवर प्रतिशोधात्मक शुल्क लादणार आहे. त्यांनी भारत, चीन आणि युरोपीय महासंघावर अमेरिकतून आयात होणाऱ्या वस्तूंवर, विशेषत: ऑटोमोबाईलवर जास्त शुल्क लादल्याचा आरोप केला. २ एप्रिलपासून लागू होणाऱ्या या प्रत्युत्तर शुल्काचा उद्देश अमेरिकन निर्यातदारांसाठी समान खेळाचे क्षेत्र निर्माण करणे हा आहे. भारताच्या शंभर टक्के टॅरिफचा संदर्भ देत ट्रम्प म्हणाले, 'ते आमच्यावर लादतात, तेवढेच शुल्क आम्ही त्यांच्यावर लादू.'

तज्ज्ञांच्या मते याचा भारतावर मोठा परिणाम होऊ शकतो, कारण भारत अमेरिकन आयातीवर सरासरीपेक्षा जास्त शुल्क लावतो. उदाहरणार्थ, भारत अमेरिकन कारवर १०० टक्के टॅरिफ लादतो. भारताचा अमेरिकेसोबतचा व्यापार अधिशेष गेल्या दशकांमध्ये ३५ अब्ज डॉलरवर पोहोचला आहे. तो भारताच्या जीडीपीच्या सुमारे एक टक्का आहे 'गोल्डन सॅक्स'च्या अहवालानुसार अमेरिकेच्या टॅरिफचा भारताच्या जीडीपीवाढीच्या दरावर ०.१ ते ०.३ टक्के नकारात्मक प्रभाव पडू शकतो. अमेरिकेने व्यापक जागतिक टॅरिफ लादल्यास त्याचा प्रभाव ०.६ टक्के इतका जास्त असू शकतो. आधीच कमकुवत झालेल्या भारताच्या अर्थव्यवस्थेसाठी हा आणखी एक धक्का ठरू शकतो. हे सर्व आकडे आणि तथ्ये एका मोठ्या समस्येकडे निर्देश करतात. वाहनांच्या विक्रीत घट, सोन्याच्या कर्जात वाढ, शेअर बाजाराची कमकुवत कामगिरी आणि आता अमेरिकच्या टॅरिफचा फटका या सर्व घडामोडी भारतीय अर्थव्यवस्था संकटातून जात असल्याचे सूचित करतात. सरकार भलेही जीडीपी वाढीचे आकडे सादर करेल; पण सर्वसामान्यांच्या जीवनात ही सुधारणा दिसत नाही. ट्रम्प यांच्या नवीन धोरणाचा निर्यातीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे भारताच्या आर्थिक समस्या आणखी वाढू शकतात. ग्राहकांची मागणी वाढवण्यासाठी आणि लोकांचे उत्पन्न सुधारण्यासाठी ठोस पावले उचलली न गेल्यास मंदीचे हे वादळ भयंकर स्वरूप धारण करू शकते. केवळ सरकारसाठीच नाही, तर प्रत्येक सामान्य भारतीयासाठी ही चिंतेची बाब आहे. हे फक्त तात्पुरते संकट आहे की पुढे आणखी कठीण दिवस येतील, हे येणारा काळच सांगेल.







**उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी ताज्या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा, भावनिक मुद्दे आणि विकासाची सांगड घालण्याचा प्रयत्न केला असला, तरी एरव्ही आर्थिक शिस्तीचे भोक्ते असलेल्या अजितदादांना लोकानुनयाचा अर्थसंकल्प का जाहीर करावा लागला, हे कोडेच आहे. असे असले, तरी निवडणुकीत दिलेल्या अनेक आश्वासनांची पूर्तता टाळून त्यांनी अर्थसंकल्पावर अधिक बोजा पडू दिलेला नाही.**

# राज्याच्या अर्थसंकल्पातून पुढे आलेले चित्र

मागोवा

**जनार्दन पाटील**

राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पात कोणत्याही मोठ्या आणि नवीन घोषणांचा समावेश नाही. अर्थात आर्थिक पाहणी अहवालातून पुढे आलेल्या माहितीचा विचार करता पवार यांच्यापुढे किती मोठे आव्हान होते, हे स्पष्ट आहे. मर्यादित साधने, वारेमाप घोषणा आणि लोकांच्या अपेक्षा यांची सांगड घालणे कठीण होते. राज्यावर सुमारे आठ लाख कोटी रुपयांचे कर्ज असताना तसेच महसुली आणि वित्तीय तुटीचा विचार करून जादा खर्चाच्या योजनांचा मोह अजितदादांनी टाळला आहे. जीएसटी कायदा लागू झाल्यानंतर राज्याच्या उत्पन्नवाढीलाही फारसा वाव नाही. त्यामुळे करांपासून मिळणारे उत्पन्न मर्यादित असताना शेतकरी कर्जमाफी, लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये देण्याच्या लोकानुनयाच्या घोषणा त्यांनी टाळल्या आहेत. राज्याच्या दरडोई उत्पन्नामध्ये असमानता, भांडवली खर्चात कपात अशा अनेक आव्हानांना तोंड देताना पायाभूत क्षेत्राच्या जादा घोषणा करणे शक्य नव्हते. अजितदादांवर ग्रामीण संस्कृतीचा पगडा आहे. त्यांनी जुन्या लोकांची आंथरूण पाहून पाय पसरण्याचा सल्ला अंमलात आणल्याचे दिसते. राज्यांच्या अर्थसंकल्पापुढील आव्हाने लक्षात घेता अजितदादा इतिहासात रमले. भविष्यकाळाची स्वप्ने त्यांनी दाखवली; परंतु वर्तमानाचा त्यांना विसर पडला, असे मात्र त्यांच्या अर्थसंकल्पाचे वर्णन करताना नमूद करावे लागेल.

अर्थसंकल्पीय भाषण करताना अजितदादांची अर्थसंकल्पावरची पकड लक्षात आली असली, तरी त्यातील बऱ्याच कामांच्या घोषणा पूर्वीच झाल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अगदी गेल्या आठवड्यात केलेल्या घोषणांपर्यंतचा समावेश अर्थसंकल्पीय भाषणात असल्याने अर्थसंकल्प हा पूर्वीच्या घोषणांची तुकडेजोड आहे का, असा प्रश्न पडावा अशी स्थिती दिसली. विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचारात लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याच्या तसेच शेतकऱ्यांच्या नियोजीत कर्जमाफीचा त्यात कुठेही उल्लेख नाही. अर्थात लाडक्या बहिणींसाठी ३६ हजार कोटी रुपयांच्या तरतुदीची घोषणा त्यांनी केली. या उपक्रमासाठी गेल्या वर्षी जुलै ते फेब्रुवारीदरम्यान ३२ हजार कोटी रुपये लागले असताना आता पुढच्या वर्षभरासाठी केलेली तरतूद पाहता लाडक्या बहिणींच्या लाभार्थी संख्येत मोठी घट होणे अपेक्षित धरले आहे. केंद्रीय महालेखापालांनी अनुनयाच्या योजनांबाबत व्यक्त केलेली नाराजी आणि केंद्र सरकारने केलेली कानउघाडणी यामुळे कदाचित आणखी लोकानुनयी जादा खर्चाच्या घोषणा अजितदादांनी टाळल्या असाव्यात.

असे असले, तरी अजितदादांनी अनेक योजनांच्या तरतुदींमध्ये वाढ केली. महिला आणि बालकल्याण, दलित, आदिवासी आदी घटकांसाठी जादा तरतूद केली असली, तरी गेल्या काही वर्षांचा अनुभव लक्षात घेता वर्षअखेरीस अनुनयाच्या योजनांसाठी या महत्त्वाच्या घटकांच्या खर्चाला कात्री लावली जाते, हे विसरता येणार नाही. हा अर्थसंकल्प सादर करताना अजितदादांच्या मनात जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपालिका, नगरपंचायती आणि महापालिकांचा विचार आहे, असे दिसते. पुणे-शिरूर उन्नत मार्ग, नवी मुंबई विमानतळ, वाढवण बंदर, चौथी मुंबई, पुणे-मुंबईतील मेट्रो, नाशिकचा कुंभमेळा आदींबाबतच्या त्यांच्या घोषणा एकतर पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय रस्तेबांधणी मंत्री नितीन गडकरी किंवा फडणवीस यांनी यापूर्वीच केल्या आहेत. केंद्र सरकारच्या निधीतून उभ्या राहणाऱ्या योजनांचा राज्याच्या अर्थसंकल्पात उल्लेख करण्यात आला आहे. शेतीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर अनेक दिवसांपासून चर्चेत आहे. त्याबाबतची घोषणा अजितदादांनी केली असली, तरी तरतूद मात्र अत्यल्प आहे.

अर्थसंकल्पीय भाषणात अजितदादांनी महाराष्ट्राचा विकास, पायाभूत सुविधा, शासनाच्या विविध योजना, परकीय गुंतवणूक, आद्यौगिक क्षेत्रातील वाढ यासह विविध विषयांवर भाष्य केले. महाराष्ट्रात देशी आणि विदेशी गुंतवणूक आकर्षित होत आहे. महाराष्ट्रात १५ लाख ७२ हजार ६५४ कोटींची गुंतवणूक होत आहे. त्यातून, लाखोंची रोजगारनिर्मिती होणार असल्याचे त्यांनी सांगितले असले, तरी आर्थिक पाहणी अहवालात मात्र उत्पादन क्षेत्रात झालेली घट पाहता ही गुंतवणूक उत्पादन क्षेत्रात न होता अन्य क्षेत्रात झाली का, असा प्रश्न पडतो. राज्याचे नवीन औद्योगिक धोरण जाहीर करताना त्यांनी केलेली आणखी एक महत्त्वाची घोषणा म्हणजे उद्योगांना पुरवल्या जाणाऱ्या विजेच्या दरातील कपात. अर्थात या घोषणेतही काहीच नावीन्य नाही. वीज नियामक आयोगाला गेल्या महिन्यात महावितरणने पाठवलेल्या प्रस्तावात त्याचा उल्लेख आहे. अन्य राज्यांच्या तुलनेत कमी दर असतील, अशा मोघम घोषणेतून विजेचे दर काय असतील, हे मात्र ध्वनित होत नाही. शेजारच्या कर्नाटक, गुजरात, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशापेक्षा आणि स्पर्धक असलेल्या तमिळनाडूसह अन्य राज्यांपेक्षा कमी दर असतील, तरच उद्योजक महाराष्ट्रात गुंतवणूक करतील.

सरकारतफे स्वतंत्र शेती धोरणही नंतर जाहीर करण्यात येणार आहे. मुंबई महानगर प्रदेश हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक विकास केंद्र, म्हणजेच 'ग्रोथ हब' म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वांद्रे-कुर्ला संकुल, कुर्ला-वरळी, वडाळा, गोरेगाव, नवी मुंबई, खारघर व विरार-बोईसर या सात ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाची व्यापार केंद्रे निर्माण केली जाणार आहेत. त्यामुळे मुंबई महानगर प्रदेशाची अर्थव्यवस्था सध्याच्या १४० बिलियन डॉलरवरून २०३० पर्यंत ३०० बिलीयन डॉलर, तर २०४७ पर्यंत १.५ ट्रिलीयन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे. मुंबईच्या गेटवे ऑफ इंडिया येथून मांडवा, एलिफंटापर्यंत सुरक्षित प्रवासासाठी अत्याधुनिक सुविधायुक्त बोटींसाठी आर्थिक प्रोत्साहन देण्याचे धोरण जाहीर करण्यात येणार आहे. राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालात असमान विकास आणि राज्यातील जिल्ह्यांचे असमान दरडोई उत्पन्न याचा विचार करता मुंबईला आणखी जादा प्रकल्प आणि तुलनेने छत्रपती संभाजीनगर वगळता मराठवाडा, नागपूर वगळता विदर्भ आणि नाशिक वगळता उत्तर महाराष्ट्रात मात्र विकासाला आणखी काही गती देता येईल, याचा विचार केलेला नाही.

महाराष्ट्रात आता नागरी लोकसंख्येचे प्रमाण पन्नास टक्क्यांवर गेले असल्याचा अंदाज आहे. नागरी भागात पायाभूत सुविधा दिल्याच पाहिजेत; परंतु त्याचबरोबर ग्रामीण भागाची उपेक्षा केली, तर शहरांकडे स्थलांतर वाढत जाईल आणि पायाभूत सुविधांवर आणखी ताण पडेल, हे लक्षात ठेवले पाहिजे. मुख्यमंत्री पालकमंत्री असलेला गडचिरोली जिल्हा आता 'स्टील हब' म्हणून उदयाला येत आहे. दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये गडचिरोली जिल्ह्यासाठी २१ हजार ८३० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले. त्यातून सात हजार ५०० इतकी रोजगारनिर्मिती होणे अपेक्षित आहे. गडचिरोली जिल्ह्यातील दळणवळणासाठी खनिकर्म महामार्गाचे जाळे विकसित केले जात असून त्यासाठी पहिल्या टप्प्यात सुमारे ५०० कोटी रुपये किंमतीची कामे हाती घेण्यात येणार आहेत. एकीकडे राज्याचा खर्च वाढतो आहे. दोन वर्षांमध्ये अडीच लाख कोटी रुपयांचे कर्ज फेडायचे आहे. वित्तीय तूट ४५ हजार कोटी रुपयांहून अधिक आहे. अर्थसंकल्पातील तरतुदीपेक्षा पुरवणी मागण्यांमध्ये पुन्हा एक लाख कोटी रुपयांपर्यंतच्या मागण्या मांडून आर्थिक शिस्त बिघडवली जाते. महसुली तूट आणि वित्तीय तूट निकषांपेक्षा कमी असल्याचे सांगितले जात असले, तरी ती आणखी कमी ठेवणे आवश्यक आहे. राज्यावरचे कर्ज आता पावणेआठ लाख कोटी रुपयांपर्यंत जाईल. त्यामुळे अनावश्यक खर्चावर नियंत्रण आणले पाहिजे; परंतु सध्या इतर पक्षांकडून असलेला दबाव पाहता अजितदादांना आपल्या स्वभावाला मुरड घालावी लागत असल्याचे चित्र आहे.

सार्वजनिक वाहतूक सेवा, वाहतुकीची कोंडी याचा उल्लेख अजितदादांच्या अर्थसंकल्पीय भाषणात होता. एसटीच्या सहा हजार गाड्यांचे सीएनजी आणि पीएनजीमध्ये रुपांतर करण्याची घोषणा त्यांनी केली; परंतु एसटीचे देणे आणि नवीन बसखरेदीच्या तरतुदीचा उल्लेख नाही. राज्यातील वेगवेगळी महामंडळे पांढरे हत्ती ठरत असताना आता आणखी १८ महामंडळाचा बोजा सरकारवर पडणार आहे. सरकारच्या उत्पन्नवाढीला आता मर्यादा आहेत. अजितदादांनी राज्यातील वाहनांवर कर लावून ती महाग केली आहेत तसेच दुसरा मुद्रांक वापरताना त्याची किंमत शंभर रुपयांवरून थेट एक हजार रुपये केली आहे, याचीही नोंद घ्यायला हवी. एकुणात मात्र फारशी करवाढ न लादणारा, मागील पानावरुन पुढे नेणारा असा हा मध्यममार्गी अर्थसंकल्प आहे, असे म्हणता येईल.

---

**ताज्या विजयामुळे 'टीम इंडिया' तीन चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा जिंकणारा जगातील पहिला संघ बनला आहे. दुबईत भारतीय संघाने अनेक विक्रमाची नोंद केली. सांघिकतेचे प्रदर्शन घडवत आपल्या मावळ्यांनी इतिहास रचला. हा इतिहास कसा आकाराला आला? त्याला कोणते घटक कारणीभूत ठरले? भारताला या मौल्यवान विजयाने नेमके काय दिले?**

# 'चॅंपियन' भारत !

खास बात

**अजय तिवारी**

भारताने वन डे वर्ल्ड कप स्पर्धा- २०२३, टी २० वर्ल्ड कप स्पर्धा - २०२४ आणि आता चॅम्पियन्स वन डे स्पर्धा - २०२५ या आयसीसीच्या सलग तीन स्पर्धांमध्ये मिळून २३ पैकी २२ सामने जिंकण्याचा विक्रम केला आहे. टी २० वर्ल्ड कप जिंकल्यावर आम्ही चॅम्पियन्स ट्रॉफीदेखील भारतात आणू, असे म्हणणाऱ्या कर्णधार रोहित शर्माने आपल्या संघावरचा विश्वास खरा करून दाखवला. करंडक जिंकल्यावर हा संपूर्ण संघाने दिलेल्या योगदानाचा विजय आहे असेही त्याने आवर्जून सांगितले. दुबई आंतरराष्ट्रीय मैदानावर खेळल्या गेलेल्या आयसीसी चॅम्पियन्स करंडकाच्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडला पराभूत करत हा करंडक मिळवण्याची हॅटट्रिक साधली. तत्पूर्वी झालेल्या सलग साखळी सामन्यांमध्ये भारताने एकही सामना न गमावता पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या दिग्गजांचा पराभव केला होता. आठ संघांचा सहभाग असलेली ही प्रतिष्ठेची स्पर्धा एक प्रकारे मिनी वर्ल्ड कपच मानली जाते. भारताच्या फिरकी गोलंदाजीने या सामन्यात कमाल केली. कुलदीप यादवने १० षटके गोलंदाजी करून केवळ ४० धावा देऊन दोन महत्वाचे बळी टिपले. त्याला साथ देणाऱ्या वरुण चक्रवर्तीने आपल्या दहा षटकांमध्ये केवळ ४५ धावा देत दोन बळी मिळवले. त्यांना मोलाची साथ देत रवींद्र जडेजा आणि महम्मद शमी यांनी १-१ बळी मिळवला. कुलदीप यादवने भारताच्या ११व्या आणि वैयक्तिक पहिल्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर या स्पर्धेत सातत्याने उत्तम खेळाचे प्रदर्शन करणाऱ्या रचीन रवींद्रचा महत्वपूर्ण बळी मिळवला. हार्दिक पंड्या आणि रवींद्र जडेजा प्रत्येकी फक्त एक गडी बाद करण्यात यशस्वी ठरले असले तरी त्यांनी आपल्या दहा षटकांमध्ये न्यूझीलंडच्या फलंदाजांना प्रत्येकी केवळ तीस धावा देऊन दबाव ठेवला. एका दृष्टीने पाहता न्यूझीलंडच्या आयसीसी करंडक मिळवण्याच्या स्वप्नावर भारतीय फिरकीने पाणी फिरवले असे म्हटले तर वावगे ठरू नये.

तत्पूर्वी, रविवार २३ फेब्रुवारी २०२५ रोजी चॅम्पियन ट्रॉफीमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या महत्त्वाच्या सामन्याकडे भारतीय आणि पाकिस्तानी क्रीडाचाहत्यांच्या नजरा लागल्या होत्या. पारंपरिक महत्त्व असलेल्या आणि पारंपरिक प्रतिस्पर्धी असलेल्या दोन संघांमध्ये दुबईमध्ये चकमक झाली. या ब्लॉकबस्टर सामन्यात भारताने पाकिस्तानचा सहा गडी राखून पराभव केला. विराट कोहलीच्या ५१ व्या एकदिवसीय धडाकेबाज शतकामुळे भारताला हा विजय मिळाला. हा सामना भारतीयांच्या दृष्टीने प्रतिष्ठेचा होता, कारण यापूर्वी पाकिस्तानने चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारतीय संघाला तीन वेळा पराभूत केले होते. भारतीय संघाने आता त्यांची बरोबरी केली आहे. क्षणाक्षणाला रंगतदार होत गेलेल्या आणि उत्कंठा वाढवणाऱ्या या सामन्यातील विजयाने भारतात होळीच्या सणाआधीच विजयी रंगांची उधळण झाली. राजकीय क्षेत्रापासून सामान्य जनतेने भारतीय संघावर सोशल मीडियाद्वारे अभिनंदनाचा वर्षाव केला. न्यूझीलंडच्या डावाची सुरुवात रचिन रवींद्र आणि विल यंग यांनी झोकात केली. रचिन या स्पर्धेत सातत्याने चांगल्या खेळाचे प्रदर्शन करत असल्याने त्याच्यावर भारतीय गोलंदाजांचे जास्त लक्ष होते. भारताकडून मोहम्मद शमीने गोलंदाजी सुरू केली. न्यूझीलंड क्रिकेट संघाच्या पाच षटकांनंतर ४५ धावा झाल्या असताना २९ धावांवर रचिन रवींद्रचा कॅच श्रेयस अय्यरने सोडला. त्यातून वरुण चक्रवर्तीने भारताला सावरत पहिले यश मिळवून दिले. त्याने विल यंगला १५ धावांवर बाद केले. कुलदीप यादवने अकराव्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर रचिन रवींद्रला बाद केले. त्याला फक्त ३७ धावा करता आल्या, म्हणजेच जीवदान मिळाल्यावर कुलदीपने त्याला फक्त आठ धावा काढू दिल्या. न्यूझीलंडचा स्कोअर कमी ठेवण्यात या विकेटचा फार मोठा वाटा होता. परत कुलदीप यादवनेच धोकादायक फलंदाज केन विल्यमसनला फक्त ११ धावांवर परत पाठवले. त्यावेळी न्यूझीलंड क्रिकेट संघाने २० षटकांनंतर शंभर धावांचा टप्पा पूर्ण केला होता. धडाकेबाज टॉम लॅथमला रवींद्र जडेजाने बाद केले. तो फक्त १४ धावा करून बाद झाला. डॅरिल मिशेलने सावध खेळ करत संघाची धावसंख्या १५० च्या पुढे नेली. त्यानंतर वरुण चक्रवर्तीने ग्लेन फिलिप्सला तर मोहम्मद शमीने जलदगती गोलंदाज डॅरिल मिशेलला ६३ धावांवर बाद केले. ही देखील न्यूझीलंडच्या बाजूने मोठी खेळी ठरली. ब्रेसवेल आणि मिशेल यांच्या अर्धशतकांमुळे न्यूझीलंड क्रिकेट संघाने २५१ धावा केल्या.

भारताच्या डावाची वैशिष्ट्ये सांगायची तर, न्यूझीलंडनंतर फलंदाजीला आलेल्या रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांनी भारताकडून सुरुवात केली आहे. रोहित शर्माने फक्त ४१ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. शुभमन गिलने मात्र त्याच्या आक्रमक खेळाला आवर घालून सावध पवित्रा घेतल्याचे जाणवत होते. सुरवातीलाच एखादा बळी गेल्याने सोपे वाटणारे टार्गेट तळातल्या फलंदाजांना अवघड जाऊ नये, ही कर्णधाराची योजना असावी. आणि त्याला अनुसरून भारताने १० षटकांमध्ये एकही विकेट न गमावता ६४ धावा केल्या तर १७ षटकांमध्ये रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांनी शतकी भागीदारी केली. तीच भारताच्या विजयात निर्णायक ठरली असे म्हटले तर वावगे ठरू नये. शुभमन गिलचा ३१ धावांवर सॅंटनरने बळी घेतला, तो या स्पर्धेमध्ये सातत्याने चांगली गोलंदाजी करत होता. विराट कोहली फक्त एक धाव काढल्यानंतर मायकेल ब्रेसवेलच्याच गोलंदाजीवर बाद झाला. त्यावेळी भारतीय फलंदाजी दबावाखाली आली. त्यानंतर भारताने रोहित शर्माची महत्वाची विकेट गमावली. तो ७६ धावांची खेळी खेळून बाद झाला. मूळच्या भारतीय वंशाच्या रचिन रवींद्रने त्याचा बळी घेतला. काइल जेमीसनने श्रेयस अय्यरला ४४ धावांवर जीवदान दिले पण त्याचा फार फायदा न उठवता तो ४८ धावा करून रचिन रवींद्रकडूनच बाद झाला. त्यानंतर अक्षर पटेलला मायकेल ब्रेसवेलने पायचीत केले. त्याच्या जागी आलेला हार्दिक पंड्या गरज नसताना चुकीचा फटका खेळून झेलबाद झाला. त्यानंतर कुठलेही नुकसान न होऊ न देता के. एल. राहुल आणि रवींद्र जडेजा जोडीने भारताला विजय मिळवून दिला.

आज भारत या सुवर्णस्मृतींमध्ये मग्न असला तरी सातत्यपूर्ण आणि धडाकेबाज खेळीमुळे या खेळात महारथी बनला आहे, हे कायम लक्षात ठेवले जाईल.



# 'एक देश - एक एमएसपी' महाराष्ट्रासाठी अन्यायी

एमएसपीची हमी देणे, हा शेतकऱ्यांच्या समृद्धीचा एकमेव मार्ग होऊ शकत नाही. पण तरीही, एक देश - एक एमएसपीचे अनाठायी धोरण राबवले जात आहे. त्यामुळे उत्तर भारतातील राज्यांचा फायदा होत आहे आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या मात्र तोंडाला पाने पुसली जात आहेत.

स्वातंत्र्यानंतर सर्वाधिक काळ चाललेले शेतकरी आंदोलन सध्या पंजाबमध्ये सुरू आहे. त्यांच्या एकूण पंधरा मागण्या आहेत. त्यापैकी सर्वांत महत्त्वाची मागणी आहे, ती सर्व शेतमालाची किमान आधारभूत किमतीच्या (एमएसपी) खाली विक्री होणार नाही, याची हमी देणारा कायदा केंद्र शासनाने करावा आणि त्याची चोख अंमलबजावणी व्हावी.

तसे पाहिले तर पंजाब - हरियाणातील शेतकरी पिकवत असलेला सर्व गहू आणि भात सरकार आधारभूत किमतीने खरेदी करतच आहे. नवीन कृषी कायद्यांना विरोध करण्यासाठी झालेल्या आंदोलनादरम्यान, पंजाब सरकरने २०२० मध्ये असा कायदाही केला आहे. मग ही मंडळी आंदोलन का करत आहेत, हा प्रश्न आहे.

**कशी ठरते एमएसपी?**

भारतात एमएसपी ठरवण्याची सरासरी पद्धत आहे. त्यामध्ये प्रत्येक राज्यातील विविध सेंटरमधून, रँडम पद्धतीने शेतकऱ्यांकडून उत्पादन खर्चाची माहिती घेतली जाते. ती राज्य सरकारकडे सादर केली जाते. राज्य सरकार त्याची सरासरी काढून केंद्र सरकारला शिफारशीच्या रूपात पाठवते.

अशा सर्व राज्यांतून आलेल्या शिफारशींची सरासरी काढली जाते आणि कृषी मूल्य व खर्च आयोग, केंद्र शासनाकडे संभाव्य एमएसपी कळवते. हे आकडे अन्न मंत्रालय, ग्राहक व्यवहार मंत्रालय, परराष्ट्र व्यापार मंत्रालय यांच्याकडे पाठवले जातात. प्रत्येक मंत्रालय आपल्या सोयीने यात काटछाट सुचवते. महागाई नियंत्रण, अन्य देशांशी केलेले करार वगैरे सर्व बाबी लक्षात घेऊन अंतिम एमएसपी जाहीर केली जाते, ती कधीच खऱ्या उत्पादन खर्चावर आधारित नसते.

**महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा तोटा**

गेल्या अनेक दशकांपासून केंद्र शासनाने जाहीर केलेली एमएसपी ही महाराष्ट्र सरकारने केलेल्या शिफारशींपेक्षा खूप कमी आहे. केंद्रीय कृषी मूल्य आयोग सुद्धा प्रत्येक राज्याचा उत्पादन खर्च काढत असते आणि त्यानुसार आधारभूत किमती जाहीर होतात. २०२२-२३ मध्ये केंद्र शासनाने भात पिकाला जाहीर केलेली एमएसपी २०४० रुपये प्रति क्विंटल होती, तर महाराष्ट्राने केलेली शिफारस ४४५२ रुपये प्रति क्विंटल इतकी होती.

याच हंगामात गहू पिकासाठी केंद्र शासनाने जाहीर केलेली एमएसपी २०१५ रुपये इतकी, तर राज्य शासनाची शिफारस ३७५५ रुपये प्रति क्विंटल होती. यातून महाराष्ट्राच्या शेतकऱ्याचा किती तोटा होतो, हे दिसते. सरासरी पद्धतीत पंजाबातील



शेतकऱ्यांचा मात्र मोठा फायदा होतो. २०२३-२४ या वर्षात कृषी मूल्य आयोगाने काढलेल्या पंजाबच्या गव्हाचा उत्पादन खर्च प्रति क्विंटल केवळ ७८६ रुपये आहे आणि एमएसपी प्रति क्विंटल २२७५ रुपये मिळाली.

राज्याचा भाताचा उत्पादन खर्च प्रति क्विंटल ८६४ रुपये आहे आणि एमएसपी २१८३ रुपये प्रति क्विंटल मिळाली. याच वर्षात कृषी मूल्य आयोगाने महाराष्ट्रातील भात आणि गव्हाचा काढलेला उत्पादन खर्च अनुक्रमे २८३९ व २११५ रुपये प्रति क्विंटल आहे. या दोन्ही पिकांना राज्य सरकारची शिफारस चार हजार रुपयांपेक्षा जास्त दराची आहे. म्हणजे एमएसपी उत्पादन खर्चापेक्षा ५० टक्के कमी आहे.

**अनिल घनवट**

**उत्पादन खर्चात फरक का?**

भारतातील प्रत्येक राज्यात सर्व पिके कमी-जास्त प्रमाणात पिकवली जातात. पण, काही राज्यांतील जमीन, हवामान, पाण्याची उपलब्धता ठराविक पिकांना पोषक असते. त्यामुळे त्या पिकाची उत्पादकता त्या राज्यामध्ये जास्त असते. उत्पादकता वाढली की उत्पादन खर्च कमी होतो.

शिवाय, प्रत्येक राज्यात मजुरीचे दर सारखे नसतात, ट्रॅक्टरसाठी लागणाऱ्या डिझेलचे दर वेगळे असतात. कुठे वीज मोफत, तर कुठे पाणी मोफत अशा गोष्टींमुळे उत्पादन खर्चात मोठा फरक पडू शकतो. पंजाबमध्ये अतिशय सुपीक जमीन आहे. विविध धरणांतून पाण्याची उपलब्धता आहे. वीज मोफत आहे. त्या राज्यात गव्हाचे सरासरी प्रति एकर २२ ते २५ क्विंटल उत्पादन येते आणि महाराष्ट्रात १२ ते १५ क्विंटल येते. मग सर्व राज्यांना सरसकट एकच एमएसपी देऊन कसे चालेल?

पंजाब - हरियाणामध्ये एमएसपीवर होत असलेल्या धान्य खरेदीचा खर्च केंद्र शासन करते. म्हणजे करदात्यांचा, शेतकऱ्यांसाठी खर्च होणारा पैसा फक्त पंजाब - हरियाणातील शेतकऱ्यांच्याच पदरात पडतो.

**काय करायला हवे?**

मुळात किमान आधारभूत किमतीची म्हणजे एमएसपीची हमी देणे, हा शेतकऱ्यांना समृद्ध करण्याचा एकमेव मार्ग होऊ शकत नाही. हमीभाव हा कमी भाव असतो, तो नफा देणारा नसतो. तथापि, अतिरिक्त उत्पादन झाले, खुल्या बाजारातील दर खूपच कोसळले, तर किमान काही संरक्षण असावे म्हणून सरकारने एमएसपी अर्थात हमीभाव द्यायचे ठरवले, तर कोणत्या पिकांना किती एमएसपी द्यायची, हे ज्या त्या राज्याने ठरवले पाहिजे.

तसे झाले तरच त्या राज्यातील शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च भरून निघण्याची शक्यता आहे. ज्या पिकांचे उत्पादन वाढवण्याची गरज आहे, त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी जास्त एमएसपी देऊन उत्पादन वाढवावे.

पंजाब - हरियाणामध्ये भात आणि गहू जशी मुख्य पिके आहेत, त्याप्रमाणे महाराष्ट्रात कांदा, कापूस, सोयाबीन, तूर व सर्व तेलबियांना एमएसपी जाहीर करून संरक्षण देण्यात यावे. या शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना प्रोत्साहन द्यावे.

यासाठी हमीभावाचा कायदाच केला पाहिजे, असे नाही. या पिकांची देशांतर्गत आणि प्रदेशात किफायतशीर दरात विक्री करण्याची सुलभ व्यवस्था केली, तर एमएसपीची गरजच भासणार नाही. पण तरीही, एक देश - एक एमएसपीचे अनाठायी धोरण राबवले जात आहे. त्यातून अन्य राज्यांतील पिकांच्या वाढीव उत्पादन खर्चाच्या सरासरीमुळे उत्तर भारतातील राज्यांचा फायदा होत आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या मात्र तोंडाला पाने पुसली जात आहेत. राज्यकर्ते याची दखल घेणार का, हाच प्रश्न आहे.

(ghanwatanil77@gmail.com)

■ ■ ■ ■



# सत्ताकांक्षेच्या लाटांमध्ये लोकशाही टिकावी म्हणून...

राज्यघटनेच्या उद्देशिकेची सुरूवात होते तीच मुळात आम्ही भारताचे लोक.. या शब्दांनी. हे लोक म्हणजे परग्रहावरील कोणी दुसरे - तिसरे नसून तुम्ही - आम्ही सर्वसामान्य लोक आहोत. बांधकाम करताना पाया कच्चा राहिला की इमारतही कमकुवत बनते. नागरिकाच्या रुपातील मतदार हा कोणत्याही लोकशाहीचा पाया असतो. तोच मजबूत नसेल तर लोकशाही भक्कम होणार नाही. त्यामुळे लोकशाही हे सर्वार्थाने लोकांचे राज्य असल्याची जाणीव दृढ करत, मतदाराला सतत भानावर आणणे गरजेचे आहे.

लोकशाही प्रक्रियेतील सर्वसामान्यांचा सहभाग व्यापक असला पाहिजे. स्वातंत्र्यलढा सुरू असताना महात्मा गांधींचा अहिंसेचा आग्रह पाहून एकदा सरदार पटेलांनी त्यांना विचारले की, एवढ्या बलाढ्य, हिंस्त्र ब्रिटिश राजवटीच्या विरोधात लढायचे तर मोठ्या क्रांतीची गरज आहे. अहिंसेने ती साध्य होईल का?

तेव्हा गांधीजी म्हणाले, सरदार, आपल्याला क्रांती नव्हे, उत्क्रांती घडवायची आहे. देश स्वतंत्र कुठल्याही मार्गाने झाला असता, तरी नंतर देशाला स्वतंत्र म्हणून जगण्यासाठी, तग धरण्यासाठी संस्कार हवा होता. स्वातंत्र्यलढ्याने तो संस्कार देशाला दिला. पण, हा संस्कार आज कितपत टिकून आहे?

आत्ताच्या चाळीशी- पन्नाशीतल्या पिढीसाठी स्वातंत्र्यलढ्याचे कवित्व संपले आहे. २००० नंतरच्या ह्यमिलेनियम बेबीजह्नचा तर या इतिहासाशी काडीमात्र संबंध नाही. मग लोकशाहीची पुढची वाटचाल नेमक्या कुठल्या मूल्यांवर होणार आहे?

आज लोकशाही वाचवण्यासाठी, तिचे पावित्र्य टिकवण्यासाठी एक नव्या उत्क्रांतीची गरज आहे. आपण कोणीही असू; लोकशाहीतील आपली नेमकी कर्तव्ये काय, हा धडा प्रत्येकाला नव्याने गिरवावा लागणार आहे. कुंभमेळ्यात कमी काळात काही कोटींचा जनसमूह पुण्य कमावण्यासाठी प्रयागराजच्या संगमावर एकवटला, तशाच श्रद्धा आणि भक्तिभावाने लोकशाही शाबूत ठेवण्याचा निग्रह करून सदसद्विवेकबुद्धीच्या महासागरात डुबकी मारण्याचा महाकुंभ १४० कोटी जनतेला एकत्रितपणे साजरा करावा लागणार आहे.

भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यावर १९५० मध्ये आपले प्रजासत्ताक अस्तित्वात आले. त्यानंतर लगेचच २५ ऑक्टोबर १९५१ म्हणजे एकाच वर्षात देशात पहिल्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंसह सर्व नेत्यांना निवडणुकांना सामोरे जावे लागले. आयुष्याची अनेक वर्षे स्वातंत्र्यलढ्यात तुरुंगामध्ये घालवलेल्या नेहरूंना निवडणुका लांबवणे आणि त्याशिवाय पंतप्रधानपदी राहणे शक्य होते. पण, देशाने सर्वांना सामावून घेणारी राज्यघटना निर्माण केली आणि तातडीने तिचे पालन करण्यास सुरूवात केली.

**डॉ. अमोल अन्नदाते**

हा इतिहास सांगण्याचे कारण म्हणजे, स्वातंत्र्यासाठी जसे एका पिढीने बलिदान दिले, तसे राज्यघटनेचे पावित्र्य टिकवण्यासाठी आणखी एका पिढीने सर्वस्व दिले. अशा दीर्घ संघर्षाने मिळालेल्या प्रजासत्ताकाचे पावित्र्य राखण्यासाठी आपण काय करणार आहोत, हा प्रश्न ज्याने त्याने स्वतःला विचारायला हवा.

लोकशाही आणि आपला देश पुढे जाणार की मागे, याचा निर्णय मतदानयंत्राचे बटन दाबताना आपण घेत असतो. त्यावेळी या लोकशाहीच्या आणि देशाच्या बळकटीसाठी आपण काय केले, याची मनोमन उजळणी प्रत्येकाने केली पाहिजे. कारण आपण कसे वागतो - बोलतो, विचार करतो, कर्तव्य बजावतो, देशाप्रति निर्णय घेतो या गोष्टींच्या एकत्रित परिणामांतून आपले आणि पर्यायाने देशाचे भविष्य बिघडणार वा सुधारणार असते.

देशाची स्वातंत्र्यानंतरची पहिली पन्नास वर्षे संघर्षात गेली. पुढे एका वर्गाचा संघर्ष संपला आणि देशात आहे रे आणि नाही रे या वर्गातील दरी खूप मोठी झाली. देशात काहीही घडले तरी माझे काय बिघडते? ही भावना बहुतांशांमध्ये प्रबळ होणे, ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा असते.

देश कशामुळे प्रगती करतात किंवा कशामुळे अधोगतीला जातात, हे सांगणारा जगाचा मोठा इतिहास आपल्यासमोर आहे. युद्ध कशी जिंकली जाऊ शकतात, हे सांगणारी आर्ट ऑफ वॉरसारखी अनेक पुस्तके आहेत. पण, लोकशाहीच्या जतन - संवर्धनाची प्रक्रिया मांडणारे आणि त्यासाठीचे तत्त्वज्ञान सांगणारे मार्गदर्शक साहित्य मात्र उपलब्ध नाही.

लोकांचे, लोकांसाठी, लोकांमार्फत चालवलेले राज्य हवे असेल, तर हक्कांसोबत कर्तव्यपालनाचे भान आणि राज्यघटनेच्या मूलतत्त्वाचे ज्ञान प्रत्येकाला असले पाहिजे. ही जाणीव ठेऊन आपण देशाच्या हितासाठी ठाम राहिलो, तरच सत्ताकांक्षेच्या लाटांमध्येही देशातील सामान्य माणसाचे स्वातंत्र्य अबाधित राहिल, पर्यायाने लोकशाहीसुद्धा चिरायु होईल.

(dramolannadate@gmail.com)

■ ■ ■

# एका काश्मिरी माणसाचा हृदयस्पर्शी आत्मशोध...

काश्मीर खोरं नक्की आहे तरी कसं? तिथल्या माणसांच्या आयुष्यात सतत काहीतरी धुमसतंय. त्यातून येणारं विस्थापन, अस्तित्व नाकारण्यासाठी, ओळख लपवण्यासाठी होणारी होरपळ आणि त्यातून वाट्याला येणारा एकाकीपणा.. या सगळ्यांचं यथार्थ दर्शन रूहमधून घडतं.


------------------

आपण पाहतो ते आताचे काश्मीर आणि अद्याप आपल्यापर्यंत न पोहोचलेलं खोरं यात किती अंतर आहे, याचे प्रत्यंतर मानव कौल यांच्या रूह या पुस्तकातून वाचकाला येतो. न दिसणाऱ्या कित्येक कथा-कहाण्या वाट पाहात असतात, असे वाटून मी अपेक्षेने या अंधारामागे धावत असतो, असं कौल एके ठिकाणी सांगतात.

आपण जगलेले आयुष्य पुन्हा नव्याने अनुभवण्यासाठी काहीसं उत्सुक असलेलं त्यांचं मन आपल्याशी मुक्तपणे संवाद साधतं. आपण जे आयुष्य जगतो, त्यापासून कधीच दूर जाऊ शकत नाही. त्याप्रमाणे काश्मीरच्या प्रवासातील अनुभवांबद्दल ते म्हणतात की, माझ्या भूतकाळापासून लांब पळायचा मी जेवढा प्रयत्न करत होतो, तेवढाच त्याच्याकडे खेचला जात होतो.

लहानपणी श्रीनगरमध्ये राहात असताना, बेकरीतून लवास घेऊन येणे, कंदूर भट्टीजवळची ती उबदार माणसं, आईने केलेला गरमगरम चहा आणि लवास कधी मिळेल, याची वाट पाहात फेरन घानून बसलेले बाबा.. हे सगळं त्यांना लख्ख आठवतं. हा लेखन प्रवास लिहिताना त्यांच्या मनाच्या तळाशी कितीतरी गोष्टी एकाच वेळी फेर धरत.

एकेकाळी जे पहिले होते, ज्याचा गंध अनुभवला होता, ज्याचा स्वाद घेतला होता, त्याबद्दल लिहिता लिहिता त्यांचे मन आणि पावलं त्यांना अनंतनागपासून ख्वाजाबागेपर्यंत त्यांच्या मूळ घरापर्यंत घेऊन जातात. लहानपणी काश्मीर सोडून मध्य प्रदेशात येणं ही लेखकाच्या आयुष्यातील ही एक महत्त्वाची घटना असली, तरी आपण पुन्हा कधी तरी तेथे परत जाऊ, हा विश्वास त्यांच्या मनात होता.




**स्वप्नील जोशी**

काश्मीरमधील आपल्या घराजवळ पोहोचताच तेथून बाबांना केलेला फोन, त्यांच्यातला दोन - तीन वाक्यांचा संवाद, रुहची सोबत.. हे सगळं वाचताना मन हरखून जातं. जात, धर्म, लिंग या सगळ्यांच्या संकुचित सीमा ओलांडून मानवतेचे आणि माणसांच्या भोळ्या चेहऱ्याआड लपलेल्या अमानवी प्रवृत्तीचे दर्शनही लेखक आपल्याला करून देतो.

संपूर्ण पुस्तक वाचल्यावर आपल्याला रूह या शीर्षकामागे असलेली लेखकाची मनोभूमिका कळते. हा सगळा लेखनप्रपंच रूहच्या अमेरिकेतील भेटीतच निश्चित झाला होता. तिने दिलेले आव्हान पूर्ण करताना, आपण काश्मीरचा प्रवास कसा केला हे कथन करतानाच, तिथे भेटलेल्या प्रत्येक पात्राची स्वतंत्र गोष्ट कौल आपल्याला सांगतात.

खोऱ्यामध्ये आता परिस्थिती ठीक आहे, या वाक्याचा नेमका अर्थ काय आहे? हे आपल्याला अद्यापपर्यंत कळलेले नाही. खोऱ्यात पर्यटक आले की, तिथले लोक आपला थकवा पोत्यात भरून दल सरोवरात बुडवून टाकतात, या त्यांच्या वाक्यातून वास्तवातील परिस्थितीचा अंदाज येतो.

काश्मीर हाच विषय केंद्रस्थानी ठेवून या पुस्तकाची निर्मिती झाली आहे. मानव कौल यांचे काश्मीरबद्दलचे विचार, स्वतःशी झालेले संवाद पुस्तकात सुसूत्रपणे एकत्रित उतरले आहेत. काश्मीर खोऱ्यातील स्वर्गीय आनंद देणारा निसर्ग आणि त्याचे वर्णन करताना लेखकाने सफरचंदाचे झाड, धुक्यात हरवलेली वाट, तेथील खाद्यसंस्कृती, घरांची रचना हा सगळा भाग चित्रमय स्वरुपात आपल्यासमोर उभा केला आहे.

काश्मिरी पंडितांचे विस्थापन आणि दहशतीचे सावट या सामाजिक प्रश्नाच्या मुळाशीही आपण येऊन पोहोचतो. लेखकाच्या नजरेतून मुक्तपणे वाहणारी झेलम नकळत आपली होते. आपल्या प्रवासाचे, वर्तुळ पूर्ण होत असताना सोबत वडील नसण्याची खंत लेखकाने कवितेतूनच फार सुंदरपणे मांडली आहे.

या पुस्तकातील आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही बाबी पूर्णपणे एकरूप झाल्या आहेत. पुस्तकाच्या मध्यावर आल्यावर वाचकांना जाणीव होते की, अरे, अजून बरंचसं काश्मीर आपल्याला समजून घ्यायचंय!

नीता कुलकर्णी यांनी केलेला या पुस्तकाचा मराठी अनुवाद मूळ पुस्तकाइतकाच या विषयामध्ये गुंतवून ठेवणारा आहे. कोणताही विशिष्ट दृष्टिकोन अथवा धारणा न ठेवता, काश्मिरी लोकांच्या आत्म्याला झालेल्या जखमांची ही हळवी कथा एक वाचक म्हणून प्रत्येकाने वाचावी अशी आहे.

---------------

**पुस्तकाचे नाव : रूह**
**लेखक : मानव कौल**
**अनुवाद : नीता कुलकर्णी**
**प्रकाशक : रोहन प्रकाशन**
**पाने : २००, किंमत : २९५ रु.**

■ ■ ■ ■

# एआयची धास्ती वाटतेय? चला, त्याच्याशी दोस्ती करू!

सध्या सगळीकडं एआयची चर्चा आहे. या क्रांतिकारी तंत्रज्ञानामुळं आपलं जगणं अधिक सोपं, वेगवान आणि समृद्ध होऊ शकतं. त्यासाठी ते कुशलतेने आणि जबाबदारीने हाताळता आलं पाहिजे.

आजकाल आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता हा परवलीचा शब्द झाला आहे. अवघ्या एका वर्षात चॅट जीपीटी आणि त्यासारख्या एआय आधारित अनेक टूल्सनी सगळ्याच क्षेत्रांमध्ये अफाट बदल घडवायला सुरूवात केली आहे. मग ते वैद्यकीय आणि शिक्षण क्षेत्र असो किंवा शेती, उद्योग क्षेत्र असो; एआयची जादू सगळीकडे दिसून येत आहे.

संगणक प्रणाली किंवा मशीनला माणसासारखी विचारशक्ती, शिकण्याची क्षमता आणि निर्णय घेण्याची क्षमता प्रदान करणारी एक आधुनिक तंत्रज्ञानप्रणाली म्हणजे एआय. माणूस जसा अनुभवातून शिकतो, तसे एआयसुद्धा माहिती आणि डेटाच्या आधारे शिकतो आणि सतत सुधारणा करत जातो.

**दहा वर्षांत वेगाने विकसन :**

संगणकांनी माणसासारखं विचार करावा, यावर १९५० च्या दशकात संशोधन सुरू झालं आणि त्याचवेळी एआयचे बीज रोवले गेले. अलीकडच्या काळात मशिन लर्निंग (ML), डीप लर्निंग (DL) आणि बिग डेटा यांसारख्या प्रगत तंत्रज्ञानांमुळे एआयचे वेगाने विकसन झाले. आता एआय फक्त आकडेमोड किंवा माहिती प्रक्रिया न करता शिकण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता बाळगतो.

एआयच्या विकासाची ही वाटचाल काही दशकांपासून सुरू असली, तरी गेल्या १० वर्षांत त्याने झपाट्याने प्रगती केली. मोठ्या प्रमाणातील डेटा (Big Data), संगणकांची वाढती क्षमता आणि अल्गोरिदममधील सुधारणांमुळे त्याने वेग घेतला आहे. गुगलचे सर्च इंजिन, अ‍ॅमेझॉनची शिफारस प्रणाली आणि सिरी किंवा अ‍ॅलेक्सा यांसारखे व्हाइस असिस्टंट ही एआयच्या यशाची काही सोपी आणि वास्तविक उदाहरणे आहेत.

**ऑनलाइन शॉपिंग ते अभ्यासक्रम :**

एखादी वस्तू विकत घेण्यासाठी काही वर्षांपूर्वी लागणारा वेळ आठवला, तर त्यामध्ये आणि एआयआधारित ई कॉमर्स मोबाइल अ‍ॅपमध्ये जमीन-अस्मानाचा फरक दिसतो. आता एआयच्या मदतीने गंभीर आजारांचे निदान अधिक अचूकपणे करता येते.

रूग्णांच्या वैद्यकीय नोंदींचे विश्लेषण करून उपचार सुचवले जातात. दुसरीकडे, नव्या औषधांच्या संशोधनालाही वेग आला आहे. वैयक्तिक शिकवणी (Personalized Learning) देणे, ऑनलाइन अभ्यासक्रम सुधारणे आणि विद्यार्थी-शिक्षक संवाद वाढवणे



यांसाठीही एआय मदत करते.

त्याशिवाय; स्वयंचलित कार, रोबोटिक्स, व्हर्च्युअल रिअ‍ॅलिटी (व्हीआर) आणि स्मार्ट सिटी यांसारख्या प्रकल्पांमध्येही एआय महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

**त्याला तुमच्याविषयी सगळं माहित आहे..**

भारतीय माणूस दिवसातील सरासरी ७ तास ४२ मिनिटे मोबाइलवर घालवतो. त्यामुळे आता एआयला तुमचा दिनक्रम, स्वभाव, वागणे, संवाद (आणि विसंवाद), कार्यपद्धती यातील मथितार्थ माहीत आहे.

**डॉ. अमेय पांगारकर**

एका मोबाइल अ‍ॅपवरून तुम्ही विमानाचे पुणे ते बेंगळुरु तिकीट काढले, तर तुम्ही बेंगळुरुला किती दिवसांच्या अंतराने आणि कोणत्या कामासाठी जाता? कोणत्या ठिकाणी / परिसरात राहता? काय खाता-पिता? असा सगळा व्यक्तिगत बिग डेटा त्याला माहीत असतो.

आज एआय ही फक्त एक वैज्ञानिक संकल्पना न राहता प्रत्यक्षात उपयोगात येणारे साधन बनले आहे. या नवतंत्रज्ञानामुळे आपल्याला न भूतो अशी परिस्थिती अनुभवायला येत आहे. एआय हे केवळ वर्तमानात थांबणारे तंत्रज्ञान नाही, तर त्याचा भविष्यातील प्रभावही अमर्याद आहे. त्याचवेळी या प्रगतीबरोबरच काही आव्हानेही उभी आहेत.

गोपनीयता आणि सुरक्षिततेसंबंधी चिंता, मानवी नोकऱ्यांवरील परिणाम आणि डीपफेक तंत्रज्ञानासह एआयचा गैरवापर आदी गोष्टींवर तत्परतेने योग्य तोडगा काढण्याची गरज निर्माण झाली आहे.

एकूणच, या तंत्रज्ञानाची धास्ती घेण्यापेक्षा त्याच्याशी दोस्ती केली पाहिजे. त्याच्याशी गट्टी जमली की मोबाइल वापरू शकणाऱ्या प्रत्येकाला हे तंत्रज्ञान आणि वापरायला सोपी अशी अगणित एआय टूल्स हाताच्या बोटांवर खेळवता येतील!

चला तर मग, आपापले सीट बेल्ट घट्ट करा, आपल्या मेंदूतील न्यूरल नेटवर्क पकडून ठेवा... घाबरून न जाता, आत्मविश्वासाने आणि एकमेकांच्या साथीने एआयया या नव्या, जादुई विश्वाची सफर करूया!

■ ■ ■ ■

# सध्या दीपिका काय करते?



बॉलिवूडमधील टॉप अभिनेत्रींपैकी एक असणारी दीपिका पदुकोण सध्या मुलगी दुआच्या संगोपनाचा आनंद घेण्यात रमली आहे. तिने मुलीला मीडियापासून दूर ठेवले आहे. मात्र अलिकडेच दिलेल्या मुलाखतीत तिने मुलीशी संबंधित प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी आपण गुगलची मदत घेत असल्याचे स्पष्ट केले आहे. थोडक्यात आता ही अभिनेत्री गुगलवर 'आईपणाशी संबंधित प्रश्न' शोधण्यात व्यग्र दिसते आहे. गुगलवर शेवटचे काय शोधले होते? असा प्रश्न विचारता दीपिकाने हसून उत्तर दिले, मी शेवटची शोधलेली गोष्ट 'माझे बाळ अन्न तोंडातून बाहेर काढणे कधी थांबवेल?' हे होते. या मुलाखतीत दीपिकाला तिच्यासाठी सुट्टीचा अर्थ काय आहे, हा प्रश्नही विचारण्यात आला. यावर 'माझा सुट्टीचा दिवस घरी आराम करण्यात, हायड्रेटेड राहण्यात, मुलीला मालिश करण्यात, बाळासोबत वेळ घालवण्यात आणि अंथरुणावर आराम करण्यात जातो' असे उत्तर दिले. मागील वर्षीच्या सप्टेंबरमध्ये दीपिका आणि रणवीर पालक झाले होते. त्यांनी फेब्रुवारी २०२४ मध्ये गोड बातमी चाहत्यांबरोबर शेअर केली होती.. त्यानंतर ३० सप्टेंबर २०२४ रोजी त्यांनी घरी आलेल्या गोंडस परीचे स्वागत केले. दिवाळीच्या निमित्ताने या जोडप्याने त्यांच्या मुलीच्या पायांचा फोटोही शेअर केला आणि चाहत्यांना तिचे नाव सांगितले. आता या गोंडस बाळाचा चेहरा कधी बघायला मिळतो याची दोघांच्या चाहत्यांना प्रतीक्षा आहे.







# जयपूरमध्ये रंगला सोहळा

अलिकडेच जयपूर एक्झिबिशन कन्व्हेन्शन सेंटर (जेईसीसी) येथे झालेल्या २५ व्या आयफा पुरस्कार सोहळ्यात 'लापता लेडीज' या चित्रपटाने मोठा विजय मिळवला. या चित्रपटाला वेगवेगळ्या श्रेणींमध्ये तब्बल दहा पुरस्कार मिळाले. अभिनेता कार्तिक आर्यन आणि चित्रपट निर्माता करण जोहर यांनी सूत्रसंचालन केलेला हा कार्यक्रम चांगलाच रंगला. यावेळी राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा आणि उपमुख्यमंत्री दिया कुमारी देखील उपस्थित होत्या. यानिमित्त राजस्थानच्या संस्कृतीच्या संगीत झलक दाखवून नृत्य सादरीकरणाची सुरुवात झाली. करिना कपूरने राज कपूर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांची 'प्यार हुआ इकरार हुआ,' 'ये गलिया ये चौबारा,' 'जीना यहान मरना यहान' ही गाणी सादर करून त्यांना श्रद्धांजली वाहिली. अभिनेत्री कृती सेनन, कार्तिक आर्यन, शाहिद कपूर, माधुरी दीक्षित यासारख्या कलाकारांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. या सोहळ्यात 'भूल भुलैया ३' साठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार जिंकणाऱ्या कार्तिक आर्यनने आपला प्रवास सांगितला. या सोहळ्यात भारतीय चित्रपटसृष्टीतील उत्कृष्ट कामगिरीसाठी राकेश रोशन यांना गौरवण्यात आले. सर्वोत्कृष्ट चित्रपट: मिसिंग लेडीज, सर्वोत्कृष्ट अभिनेता: कार्तिक आर्यन (भूल भुलैया ३), सर्वोत्कृष्ट अभिनेत्री: नितांशी गोयल (मिसिंग लेडीज), सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक: किरण राव (मिसिंग लेडीज), सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता: रवी किशन (मिसिंग लेडीज), सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री: जानकी बोडीवाला (शैतान), सर्वोत्कृष्ट खलनायक: राघव जुयाल (किल), सर्वोत्कृष्ट पदार्पण अभिनेता: लक्ष्य लालवानी (किल) हे काही महत्त्वाचे पुरस्कार चर्चेत राहिले



# ओटीटीवर 'वनवास'ची वार्ता

हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे चित्रपट विशेष संदेश देण्याचे काम करतात. याआधी त्यांनी मनोरंजन करणारे अनेक चित्रपट दिले असले तरी आजकाल हा गुणी अभिनेता महत्त्वाच्या विषयांशी संबंधित चित्रपटांमध्ये काम करताना दिसतो. मध्यंतरीच त्यांचा 'वनवास' चित्रपटगृहात प्रदर्शित झाला आणि प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. आता थिएटरनंतर तो ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. थिएटरमध्ये पाहिला असला तरी ओटीटीवर हा चित्रपट पाहण्याचीही एक वेगळीच मजा आहे. चित्रपट बॉक्स ऑफिसवर कोणताही मोठा विक्रम करू शकला नसला तरी नाना पाटेकरांसारख्या ज्येष्ठ अभिनेत्याचा सकस अभिनय बघण्यासाठी तो नक्कीच बघायला हवा.


या चित्रपटात नाना पाटेकर यांनी एका वृद्धाची भूमिका साकारली आहे. चित्रपटाची कथा या पात्राभोवतीच फिरते. पत्नीच्या मृत्यूनंतर या पात्राला एकटेपणा भेडसावतो. एवढेच नाही तर तो डिमेंशियाचा बळी ठरतो. मात्र आपली संपत्ती दान करण्याचा निर्णय घेतल्यामुळे मुले त्यांना वाराणसीत सोडतात. जिथे तो एका अनोळखी व्यक्तीला भेटतो. पुढे तो नानाच्या पात्राची कुटुंबाशी भेट घडवून आणण्याचा प्रयत्न करतो.

हा चित्रपट १४ मार्च २०२५ पासून झी फाईव्हवर बघता येत असल्यामुळे अनेकांना आनंद घेता येईल. 'वनवास'च्या कलाकारांबद्दल बोलायचे झाले तर नाना पाटेकर, उत्कर्ष शर्मा, सिमरत कौर, खुशबू सुंदर आणि राजपाल यादव यांच्या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिका आहेत. चित्रपटाची कथा अनिल शर्मा, सुनील सिरवैया आणि अमजद अली यांनी संयुक्तपणे लिहिली आहे. त्याचबरोबर अनिल शर्मा यांनी दिग्दर्शनाची जबाबदारी स्वीकारली आहे. थिएटरनंतर हा चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित येत असल्यामुळे तो अनेकांपर्यंत पोहोचेल यात शंका नाही.

# येणार 'उंटावरचा शहाणा'

मराठीत अनेक अर्थपूर्ण म्हणी आहेत. त्यातील एक असणाऱ्या 'उंटावरचा शहाणा' म्हणीला एका वेगळ्या ढंगात विनोदी स्वरूप देणारा 'उंटावरचे शहाणे' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. सौम्या प्रोडक्शनच्या निर्मितीखाली तयार होणाऱ्या या चित्रपटाच्या चित्रीकरणाचा शुभारंभ ६ मार्च २०२५ रोजी दिमाखदार सोहळ्यात पार पडला. चित्रपटाचे निर्माते प्रशांत अनिल गवळी, दिग्दर्शक शुभम सुनील दळवी, छायाचित्रकार के. विजय, कार्यकारी निर्माता विष्णु घोरपडे आणि लाइन प्रोड्यूसर बजरंग मासाळ यांच्या उपस्थितीत मुहूर्ताचा सोहळा संपन्न झाला. चित्रपटाच्या शीर्षकाप्रमाणेच हा एक हलकाफुलका, विनोदी आणि मनोरंजनाने भरलेला प्रवास असणार आहे.

'उंटावरचा शहाणा' ही मराठी म्हण आपल्या अवतीभोवती घडणाऱ्या विसंगत आणि गंमतीशीर प्रसंगांवर मार्मिक भाष्य करणारी आहे. हाच पैलू या चित्रपटात मनोरंजक पद्धतीने दाखवला जाणार आहे. समाजातील गमतीशीर आणि विसंगत गोष्टींवर हास्याचा चपखल तडका देत हा सिनेमा प्रेक्षकांचे निखळ मनोरंजन करणार आहे. अर्थात 'उंटावरचे शहाणे' हा केवळ विनोदी चित्रपट नसून तो भोवतालच्या जगाकडे मिश्किल नजरेने पाहण्याचा एक वेगळा दृष्टीकोन देईल. प्रेक्षकांना हलकं-फुलकं आणि ताजेतवाने करणारे मनोरंजन देण्याचा त्याचा प्रयत्न असेल. या सिनेमाच्या माध्यमातून



समाजातील काही विसंगतींवर हसत-हसत भाष्य करतानाच त्यातून एक महत्त्वाचा संदेशही देण्याचा दिग्दर्शकाचा मानस आहे. चित्रपटाच्या टीमकडून लवकरच कलाकारांच्या नावांची घोषणा करण्यात येणार आहे. या अनोख्या संकल्पनेवर आधारित चित्रपटाविषयी उत्सुकता वाढली असून प्रेक्षक या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

# सगळेच नादान...

निर्माता दिग्दर्शक करण जोहरचा 'नादानियां' चर्चेत होताच. खरंतर त्याचं नाव 'स्टुडंट ऑफ द इयर ३' असायला हवं होतं. अर्थात हे नाव असते तरी त्यातील अनेक त्रुटी लक्षात घेता प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला असता की नाही, या शंकेला जागा उरतेच. येथे दाखवलेले काल्पनिक कॉलेज जुन्या कॉलेजइतकेच छान असले तरी ते एखाद्या रिसॉर्टसारखे दिसते. कॉलेजच्या प्राचार्या श्रीमती ब्रिगांझा मल्होत्रा इंग्रजीत पूर्ण वाक्ये बोलण्याऐवजी शॉर्टकटमध्ये बोलतात. विषयही तोच जुना आहे. म्हणजे मध्यमवर्गीय कुटुंबातील एखादा विद्यार्थी श्रीमंतांमध्ये आला तर सुरुवातीला वर्गमित्र चेष्टा करतात. पण नायक आपल्या प्रतिभेने नायिकेला प्रभावित करतो आणि मग ते नकळत एकमेकांच्या प्रेमात पडतात. पुढे घडायचे ते सगळे घडते. या चित्रपटात इब्राहिम अली खान आणि अभिनेत्री खुशी कपूरच्या भूमिकेबद्दल तसेच त्यांच्यातील केमिस्ट्रीबद्दल उत्सुकता होती. मात्र हे दोघेही आपापल्या पात्राला न्याय देण्यात कमी पडल्याचे स्पष्ट दिसते. 'नादानियां' चित्रपटातून दिग्दर्शनात पाऊल ठेवणारी शौना गौतमचाही प्रभाव जाणवत नाही. त्यामुळेच ही विखुरलेली कथा प्रेक्षकांनी नाकारली आहे. रिवा राजदान कपूर, इशिता मोईत्रा आणि जेहान हांडा या त्रिकुटाने लिहिलेला पटकथा खूपच कमकुवत आहे. तरुण पिढीच्या समस्या आणि संघर्ष दाखवण्यात लेखक खूपच कमी पडला आहे. हा चित्रपट लिंगभेदाचा मुद्दा उपस्थित करत असला तरी विषयाची खोली गाठण्यात तो अपयशी ठरला, हे मान्य करावे लागेल. त्याचबरोबर इब्राहिमला पालकांकडून अभिनयातील बरेच ज्ञान घ्यावे लागणार आहे.







# चर्चा एका डेटिंगची

युजवेंद्र चहल आणि धनश्री वर्मा यांचा घटस्फोट झाला असून ते दोघेही आता वेगळे झाल्याची बातमी अलिकडेच आपण वाचली. मात्र घटस्फोटानंतर काही आठवड्यांनंतर सामन्यात या क्रिकेटपटूबरोबर एक नवीन 'मिस्ट्री गर्ल' दिसल्यामुळे लोकांमध्ये उत्सुकता वाढली होती. आरजे महवशचे नाव युजवेंद्र चहलच्या घटस्फोटाच्या बातमीत त्याच्याशी जोडले गेले आणि तेव्हाच त्याने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली होती.

आरजे महवश तिच्या व्हिडिओंमुळे सोशल मीडियावर अनेकदा ट्रेंडमध्ये असते, पण आता तर लोक तिला चहलची 'मिस्ट्री गर्ल' म्हणून टॅग करत आहेत. या क्रिकेटपटूच्या घटस्फोटाची बातमी प्रसिद्धीच्या झोतात आली होती तेव्हाच ट्रोलर्सनी महवशला या घटस्फोटाचे कारण सांगितले होते. आता आरजेने उत्तर दिले असून 'एखाद्या विरुद्ध लिंगाच्या व्यक्तीसोबत पाहिले गेले तर याचा अर्थ तुम्ही त्यांना डेट करत आहात असा होतो का? माफ करा, हे कोणते वर्ष आहे? आणि मग तुम्ही किती जणांना डेट करत आहात? हे कोण कोणाला कसे विचारु शकतो?' असा प्रश्न केला आहे. इतकेच नव्हे तर इतरांची प्रतिमा लपवण्यासाठी मी कोणत्याही पीआर टीमला माझे नाव ओढू देणार नाही. लोकांना मित्रमैत्रिणी आणि कुटुंबासोबत शांततेत राहू द्या, असेही तिने सुनावले आहे.

अरीज महवश ही दिल्लीची रेडिओ जॉकी आहे. रेडिओ जॉकी असण्यासोबतच तो सोशल मीडियावर कंटेंट क्रिएटर देखील आहे. ती तिच्या उत्तम आवाजासाठी आणि मनोरंजक शैलीसाठीही ओळखली जाते. सोशल मीडियावर तिचे अनेक फॉलोअर्स असून इंस्टाग्रामवरही १.४ दशलक्षाहून अधिक फॉलोअर्स आहेत. महवाशला 'बिग बॉस' आणि नेटफ्लिक्स मालिकेत काम करण्याची ऑफर मिळाल्याचेही वृत्त आहे.

ख्रिसमसच्या निमित्ताने युजवेंद्र आणि आरजे महवश सर्वप्रथम एकत्र दिसले होते आणि तेव्हाच ते प्रसिद्धीच्या झोतातही आले होते. यानंतर दोघे बऱ्याच पार्ट्यांमध्ये एकत्र बघायला मिळाले. यामुळेच त्यांच्या डेटिंगच्या बातम्या बाहेर येऊ लागल्या. तथापि, महवशने मात्र ही बाब स्पष्टपणे नाकारली आहे.

# आता विजेत्याची प्रतीक्षा

छोट्या पडद्यावर अभिनय दाखवणारे स्टार किती चांगले स्वयंपाक करतात याचा पुरावा 'सेलिब्रिटी मास्टरशेफ'मध्ये स्पष्टपणे दिसून येतो. या कुकिंग शोला टीआरपीच्या टॉप लिस्टमध्ये स्थान मिळाले नसले तरी प्रेक्षकांना तो खूप आवडतोय. टीव्ही स्टार्सनी सजलेल्या या शोला आता त्याचा विजेता मिळाला आहे. सेलिब्रिटी मास्टरशेफची सुरुवात २७ जानेवारी रोजी झाली होती. आता सुमारे दीड महिन्यानंतर शो अंतिम टप्प्याकडे वाटचाल करत आहे. अंतिम फेरीची तारीख अद्याप जाहीर झालेली नाही, परंतु टॉप ५ आणि विजेत्यांच्या नावांची चर्चा मात्र सुरू झाली आहे.

सेलिब्रिटी मास्टरशेफच्या टॉप ५ मध्ये पोहोचणारे स्टार तेजस्वी प्रकाश, गौरव खन्ना, निक्की तांबोळी, राजीव अदातिया आणि फैजल शेख असल्याची चर्चा आहे. या पाच स्पर्धकांमध्ये गौरव खन्ना हा स्टार 'अनुपमा'मध्ये अनुजच्या भूमिकेमुळे चर्चेत असून तो सुरुवातीपासूनच सेलिब्रिटी मास्टरशेफ विनरचा एक तगडा स्पर्धक समजला जात आहे. त्याने स्वयंपाक कौशल्याने अनेक वेळा परीक्षकांना प्रभावित केले आहे. त्यामुळेच आता तो शोची ट्रॉफी घरी घेऊन जाईल की नाही, हे बघणे रंजक ठरणार आहे. सेलिब्रिटी मास्टरशेफमध्ये एकूण १२ स्पर्धकांनी भाग घेतला होता. त्यापैकी चार जण बाहेर पडले आहेत. आता दीपिका कक्करची पाळी आहे. ती शो गमावणार नाही परंतु हाताच्या दुखण्यामुळे



तिने स्वतःहून शो सोडण्याचा निर्णय घेतला आहे. शेवटच्या एलिमिनेशनमध्ये कविता सिंगला बाहेर काढण्यात आले आणि त्यावर चाहत्यांनी नाराजी व्यक्त केली. हा तिच्यावरील अन्याय असल्याचे अनेकांनी म्हटले. आता सगळ्यांनाच अंतिम विजेता कोण असणार, याची प्रतीक्षा आहे.



# अजूनही चर्चा 'छावा'चीच

गेल्या एका महिन्यापासून बॉक्स ऑफिसवर राज्य करणारा चित्रपट म्हणजे 'छावा'. 'क्रेझी' आणि 'सुपरबॉईज' छावासमोर आले खरे, पण छावाच्या कमाईवर परिणाम करण्याचे धाडस कोणीही करु शकलेले नाही. या दोन्ही चित्रपटांना प्रेक्षक मिळत असले तरी 'छावा' ची क्रेझ कायम आहे. 'छावा' ने देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर ५०० कोटी रुपयांचा निव्वळ कलेक्शन आधीच पार केला आहे. मात्र ही घोडदौड जगभरातही दिसून येत आहे. या चित्रपटाने चौथ्या आठवड्यात प्रवेश करण्यापूर्वीच जगभरातील 'गदर २' चा विक्रम मागे टाकले होते. 'विकी कौशल'चा 'छावा' बॉक्स ऑफिसवर सर्वात जलद ५०० कोटींचा टप्पा ओलांडणारा चौथा हिंदी चित्रपट ठरला आहे. यापूर्वी, 'स्त्री २' (२२ दिवस), 'जवान' (१८ दिवस) आणि 'पुष्पा २' (११ दिवस) या तीन चित्रपटांनी सर्वात वेगाने हा आकडा गाठला होता. जगभरातील कलेक्शनबद्दल बोलायचे झाले तर 'छावा'ने परदेशात ८८.८४ कोटी रुपये कलेक्शन केले असून आणि भारतात एकूण कलेक्शन ६०९.६८ कोटी रुपयांच्या पुढे गेले आहे. त्यामुळेच तो टॉप १० सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांमध्ये समाविष्ट झाला होता. लवकरच 'छावा'चे जगभरातील गल्ला ७०० कोटी रुपयांच्या पुढे जाईल अशी अपेक्षा आहे.